दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक २४५ वा मंगळवार दि.२५ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# कुणाल कामराने काहीही चुकीचे केलेले नाही



मुंबई : विनोदी कलाकार कुणाल कामरा यांच्या विधानावरून सुरू असलेल्या राजकीय गोंधळात, शिवसेना (यूबीटी) नेते उद्धव ठाकरे यांनी एक मोठे विधान केले आहे.

उद्धव म्हणाले की, मला वाटत नाही की कुणाल कामराने काही चुकीचे म्हटले आहे. कुणाल कामराने काहीही चुकीचे केलेले नाही. जो गद्दार आहे तो गद्दार आहे. हे कोणावरही हल्ला करण्याबद्दल नाही. तुम्ही संपूर्ण गाणे ऐका आणि इतरांनाही ऐकवा या हल्ल्याशी शिवसेनेचा काहीही संबंध नाही. हे गद्दार सेनेने केले आहे ज्यांच्या रक्तात 'गद्दारी' आहे ते कधीही शिवसैनिक असू शकत नाहीत, असं उद्धव ठाकरे म्हणाले. नागपूर दंगलींचा कथित सूत्रधार फहीम खानच्या घरावर बुलडोझर कारवाई करण्यात आली आहे. यावर, सर्वत्र समान न्याय द्या, दंगली भडकवणा-यांवर तुम्ही काय कारवाई कराल? असा शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी असा सवाल केला आहे.


## राज्यातील जिल्हापरिषद शाळा दुरुस्तीसाठी महाराष्ट्रातील जनतेला किती दिवस वाट पहावी लागेल ? माजी मंत्री आ. अमित देशमुख यांचा सरकारला प्रश्न

लातूर / प्रतिनिधी :- महाराष्ट्र राज्यातील बहुतांश जिल्हापरिषद शाळा इमारतींची दुरावस्था झाली आहे. शासनाने याकडे त्वरित लक्ष देऊन या इमारतीची पुनर्बांधणी किंवा दुरुस्ती करावी अशी मागणी विधानसभेत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विधानसभेत केली.




महाराष्ट्र विधीमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असुन सोमवार दि. २४ मार्च २५ रोजी विधानसभेत बोलताना राज्यातील जिल्हापरिषद शाळांच्या एकूण किती इमारती अथवा वर्गखोल्या जीर्ण झाल्या आहेत, त्यांच्या दुरुस्तीसाठी एकूण किती निधीची आवश्यकता आहे? यावर्षात यासाठी शासनाने किती तरतूद केली आहे आणि सर्व शाळांची दुरुस्ती होण्यासाठी महाराष्ट्रातील जनतेला आणखी किती वर्षे वाट पाहावी लागणार आहे ? असे प्रश्नही माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उपस्थित केले. सदरील प्रश्नाला उत्तर देताना शालेय शिक्षण राज्यमंत्री श्री पंकज भोयर यांनी जीर्ण झालेल्या जिल्हा परिषद शाळांच्या इमारतींची संख्या, त्यांच्या दुरुस्तीसाठी लागणारा निधी व त्यासाठी शासनाने अर्थसंकल्पात केलेली तरतूद यासंदर्भातील आकडेवारी सादर केली, राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा इमारती दुरुस्तीचा सर्वंकक्ष अराखडा तयार करण्यात येईल अशी ग्वाही ही सभागृहात त्यांनी बोलतांना दिली.

## अकृषी कर रद्दबाबतचा शासन आदेश लवकरच निघणार ! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांना आश्वासन






लातूर / प्रतिनिधी :- महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या ४ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत अकृषी रद्द करण्याबाबतचा निर्णय झाला होता, मात्र त्याचा शासन आदेश निघालेला नाही, तो आदेश त्वरित काढावा अशी मागणी सोमवार दि. २४ मार्च रोजी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

सदरील आदेश तातडीने काढण्यात येतील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली आहे. लातूर महापालिकेने अकृषीकर भरला नाही म्हणून महसूल विभागाने लातूर येथील यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल सील केल्याची माहिती मिळाल्यानंतर माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी यासंदर्भात चर्चा केली. गाव तसेच महापालिका हद्दीतील अकृषी कर रद्द करण्याचा निर्णय शासनाने ४ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या बैठकीत यापूर्वीच घेतलेला आहे, मात्र शासन आदेश अद्याप निघालेला नाही ही बाब आमदार अमित देशमुख यांनी या चर्चेदरम्यान मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून दिली, लातूर महापालिका व इतर शासकीय, निमशासकीय आस्थापनांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीने यासंदर्भातील शासन आदेश लवकरात लवकर काढण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी आमदार अमित विलासराव देशमुख यांना दिले आहे.

## डॉ.अर्चना पाटील चाकुरकर यांनी घेतली केंद्रीय क्रिडा व युवक कल्याण मंत्री मनसुख मांडविय व राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणेयांची भेट

लातूर :- नवी दिल्ली येथे डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांनी क्रीडामंत्री मनसुख मांडविय यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी 'खेलो इंडिया' योजनेअंतर्गत लातूर जिल्हा व विभागीय क्रीडा संकुल येथे विविध विकास कामासाठी शासकीय निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात चर्चा केली. तसेच क्रीडामंत्र्यांना मागण्यांचे लेखी निवेदन देखील दिले. या निवेदनात जिल्हा क्रीडा संकुल अंतर्गत आवश्यकतेनुसार सिंथेटिक वॉकिंग ट्रॅक करीता निधी उपलब्ध करून देणे, लातूर विभागीय क्रीडा संकुलाचे अद्ययावत सुविधांसह आधुनिकीकरण करणे, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, ज्युडो, कुस्ती, हॅंडबॉल, कबड्डी इत्यादी खेळांकरिता हॉलच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देणे आदी बाबी नमूद करण्यात आल्या. खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि



विविध स्पर्धांच्या तयारीसाठी जागतिक दर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्याचा, यामागील उद्देश असल्याचे डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांनी सांगितले. लातूर जिल्ह्यातील युवा खेळाडूंना पुरेशा सुविधा मिळाव्यात, त्यांना प्रोत्साहन मिळावे व त्यांचा सर्वांगी विकास व्हावा, हा हेतू ठेवून विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात मनसुख मांडविया यांच्याबरोबर सकारात्मक चर्चा झाल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच डॉ. अर्चना पाटील चाकुरकर यांनी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांचीदेखील भेट घेतली व त्यांनाही लेखी निवेदनाद्वारे निधीची मागणी केली.

## खड्ड्यांमुळे वाहनचालकांची डोकेदुखी वाढली कंत्राटदाराच्या संथ कामामुळे शहरात आरोग्याच्या समस्या,

किनवट: शेख शौकत :-किनवट शहरातील हा एक प्रमुख मार्ग आहे कारण येथे न्यायालय, तहसील कार्यालय, नगरपरिषद, पंचायत समिती, गट शिक्षण कार्यालय, अंगणवाडी कार्यालय,बँक, रुग्णालये आणि इतर आस्थापने आहेत. रस्त्याच्या कामामुळे दिवसभर धूळ उडत आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जिजामाता चौक, अशोक स्तंभ गोकुंडा, किनवट शहरातून जाणारा एक प्रमुख रस्ता आणि राष्ट्रीय महामार्ग १६१/अ च्या वर्दळीच्या रहदारीच्या क्षेत्रादरम्यान हा रस्ता बांधला जात आहे.परंतु हे रस्ता बांधकाम सुमारे दीड महिन्यापासून थांबले आहे आणि चालू काम अपूर्ण आहे. धूळ




आणि खड्ड्यांमुळे नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.या मुख्य रस्त्यातून पायी ये-जा नागरिकाला गोकुंदा ग्रामपंचायतच्या गटरातून येणाऱ्या घाण पाणीमुळे जनताला त्रास होत आहे, बाजारातील व्यापाऱ्यांना श्वास घेण्यास त्रास होत आहे आणि वाहन मालकांना वाहन चालवताना अनेक अडचणी येत आहेत. लोकांच्या आरोग्याची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. संबंधित रस्ता बांधकाम विभाग आणि कंत्राटदाराकडून अपूर्ण काम पूर्ण होईल की नाही, याबाबत नागरिक चिंता व्यक्त करत आहेत.कोठारी ते धनोडा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१/अ चे बांधकाम रस्ते बांधकाम विभाग आणि कंत्राटदाराकडून ५ वर्षांहून अधिक काळ सुरू आहे.शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जिजामाता चौक, गोकुंडाचा अशोक स्तंभ मध्यभागी रस्त्याचे काम सुरू आहे.परंतु दीड महिन्यापासून काम अपूर्ण आहे. त्यामुळे सरकारी आणि वैयक्तिक कामासाठी किनवट शहरात येताना लोकांना अडचणी येत आहेत. रस्त्याच्या कामामुळे दिवसभर धूळ उडत असते. खोदलेला रस्ता अपूर्ण राहिल्याने लोक पडत आहेत. रस्ते बांधकामामुळे होणारी धूळ आणि प्रदूषणामुळे सर्दी, खोकला आणि दमा यांसारख्या आजारांचा धोका वाढत आहे.

## मालमत्ताकर व पाणी पट्टी कर वसूलीसाठी महानगरपालिकेची धडक वसूली व जप्ती मोहिम तसेच मालमत्ताकर दात्यांसाठी व्याज/शास्तीमध्ये ५० टक्के सूट

मालमत्ताधारकानी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन कर भरणा करून जप्ती टाळावी- आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांचे आवाहन



लातूर/प्रतिनिधी :- कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने वर्षाच्या सुरूवातीपासूनच मालमत्ताधारकासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुटची योजना लागू करण्यात आल्या होती . अद्यापही मालमत्ताधारकाकडे मालमत्ताकराची व पाणी पट्टी कराची थकबाकी मोठया प्रमाणात वसूल होणे बाकी असल्याने या वर्षातील शेवटची संधी म्हणून एक रक्कमी कराचा भरणा करणा-या मालमत्ताधारकांस लातूर शहर महानगरपालिकेमार्फत दि.२५ मार्च ते ३१ मार्च २०२५ पर्यंत थकीत करावरील व्याज/शास्तीमध्ये ५० टक्के सूट देण्यात येत आहे.

जे मालमत्ताधारक कर भरणा करणार नाहीत अशा मालमत्ताधारकावर कार्यवाही करण्यासाठी लातूर शहर महानगरपालिकेमार्फत क्षेत्रीय कार्यालय ए,बी,सी,डी निहाय विशेष वसूली व जप्ती पथकाची नियुक्त करण्यात आली असून सदर पथकामार्फत जप्तीची कार्यवाही तिव्र करण्यात येणार असून सदर कार्यवाही अंतर्गत मालमत्ता सिल करणे,आटकाव करणे,नळ कनेक्शन बंद करणे,इत्यादी कार्यवाही करण्यात येणार असून मालमत्ता जप्त किंवा सिल करून मुदतीमध्ये मालमत्ताधारकांनी कर भरणा न केल्यास अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेचा लिलाव / विक्री करून कर वसूल करण्यात येणार आहे. तरी व्याज/शास्ती माफी योजनेचा लाभ घेऊन आपल्याकडे देय असलेल्या कराचा भरणा करावा. व जप्तीसारखी कठू कार्यवाही टाळावी असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

## मुस्लिम आरक्षणावरून संसदेत प्रचंड गदारोळ

नवी दिल्ली : वृत्तसंस्था कर्नाटक राज्य सरकारने सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला, त्यावरून आज संसदेत प्रचंड गोंधळ झाला. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरू होताच, कर्नाटकातील मुस्लिम आरक्षणावरून ट्रेझरी बेंचच्या सदस्यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. गोंधळामुळे लोकसभेचे कामकाज पहिल्यांदा दुपारी १२ वा. पर्यंत, नंतर दुपारी २ पर्यंत आणि राज्यसभेचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

काँग्रेस मुस्लिम आरक्षणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बनवलेले संविधान का बदलत आहे? याचे उत्तर द्यावे, असे संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले. यावर उत्तर देताना काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, देशाचे संविधान बाबासाहेबांनी बनवले. त्याला कोणीही बदलू शकत नाही. ते सुरक्षित राहावे यासाठी आम्ही कन्याकुमारी ते काश्मीर पर्यंत भारत जोडो यात्रा काढली. आपण संविधान बदलणार आहोत असे कोणी म्हटले? यावर किरण रिजिजू म्हणाले की, बाबासाहेबांनी नाकारलेले मुस्लिम लीगचे धोरण राबवून काँग्रेस पक्षाने बाबासाहेबांची प्रतिष्ठा कलंकित केली आहे. किरण रिजिजू यांनी कर्नाटकच्या उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात केलेले विधान वाचून दाखवले आणि काँग्रेस अध्यक्षांना कारवाई करण्याचे आव्हान दिले. गदारोळानंतर अध्यक्षांनी १२ वाजेपर्यंत सभागृह तहकूब केले. कामकाज पुन्हा सुरू होताच किरेन रिजिजू यांनी आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला.

## के. वाय. पटवेकर यांची डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या मराठवाडा विभाग सहसचिवपदी नियुक्ती

लातूर : डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागाच्या सहसचिवपदी निलंगा तालुक्यातील निटूर येथील श्री. के. वाय. पटवेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यरत राहील. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी ही घोषणा केली असून, डिजिटल मीडिया क्षेत्रातील पत्रकारांसाठी कार्य करण्याच्या त्यांच्या अनुभव व योगदानाचा विचार करून त्यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे. श्री. पटवेकर हे डिजिटल माध्यमाच्या सामाजिक



जबाबदारीची जाणीव ठेवून कार्यरत आहेत आणि पत्रकारितेच्या उच्च मूल्यांची जोपासना करत आहेत. या नियुक्तीनंतर श्री. पटवेकर यांच्यावर विविध जबाबदाऱ्या येणार असून, डिजिटल मीडिया क्षेत्रातील हित जोपासण्यासाठी आणि पत्रकारांसाठी कार्य करण्याचा त्यांनी संकल्प व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीबद्दल ज्येष्ठ पत्रकार संजय जेवरीकर, दीपरत्न निलंगेकर, सतीश तांदळे, लिंबराज पन्हाळकर, बालाजी उबाळे, नेताजी जाधव, किरण कुलकर्णी यांच्यासह पत्रकार मित्रपरिवार व हितचिंतकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## संपादकीय....

# युद्धबंदीचे पडघम आणि भारत

जागतिक राजकारणात कोणतेही देश कायमचे शत्रू किंवा कायमचे मित्र नसतात. हित साधण्याचाच प्रयत्न वेगवेगळे देश करत असतात, जे इतरांसाठी धोकादायक ठरू शकते. जागतिक महासत्ता असणारी अमेरिका सध्या हेच करत आहे. पारंपरिक शत्रू असणार्या रशियासोबत मैत्री जोडत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प युक्रेनयुद्ध बंदीचे आश्वासन पूर्ण करण्याच्या दिशेने निघाले आहेत; पण हे करत असताना युरोप, कॅनडा आणि भारतासारख्या अमेरिकेच्या पारंपरिक मित्रदेशांवर टेरीफ अस्त्र उगारत आहेत. यातून भारताने योग्य तो बोध घ्यायला हवा.

रशिया आणि युक्रेन यांच्यातील तीन वर्षांपासून सुरू असलेले युद्ध थांबवण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी चर्चा करून ३० दिवसांच्या युद्धबंदीचा प्रस्ताव दिला आहे. या प्रस्तावावर युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी सहमती दर्शवली आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी या प्रस्तावावर सकारात्मक प्रतिक्रिया दिली आहे, परंतु त्यांनी एक अट घातली आहे की युद्धबंदीमुळे दीर्घकालीन शांतता प्रस्थापित झाली पाहिजे आणि संघर्षाची मूळ कारणे दूर झाली पाहिजेत. पुतीन यांनी या प्रयत्नांसाठी ट्रम्प, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर जागतिक नेत्यांचे आभार मानले आहेत. त्यामुळे गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ चालू असलेल्या युक्रेन-रशियामध्ये आता महिनाभरासाठी युद्धबंदी लागू करण्यात येण्याची शक्यता आहे.

ट्रम्प यांनी अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकांदरम्यानच सत्तेत आल्यानंतर हे युद्ध थांबवू, असे अभिवचन जगाला दिले होते. त्यानुसार २० जानेवारीपासून ट्रम्प यांनी वेगाने प्रयत्न सुरू केले. व्हाईट हाऊस आणि कीव यांच्या संयुक्त निवेदनानुसार युद्धबंदी प्रस्तावात तात्पुरत्या युद्धबंदीची तरतूद आहे, जी दोन्ही बाजूंनी मान्य केल्यास वाढविता येऊ शकते. या वर्षाच्या सुरुवातीला डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने पदभार स्वीकारल्यानंतरचा हा पहिलाच महत्त्वाचा राजनैतिक प्रयत्न आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांच्यात मध्यंतरी व्हाईट हाऊसमध्ये चर्चा झाली. या भेटीतील वादंगानंतर युक्रेनला अमेरिकेकडून होत असलेली मदत थांबविण्यात आली होती. लष्करी उपकरणे आणि गुप्तचर यंत्रणेच्या पुरवठ्यावर बंदी घातल्यामुळे युरोपीय मित्रराष्ट्रांकडून तीव्र टीका झाली. तथापि, युक्रेनने युद्धबंदीला सहमती दर्शविल्यानंतर अमेरिकेने आपला लष्करी पाठिंबा पुन्हा सुरू केला आहे. ही संपूर्ण युद्धबंदी असून युक्रेनने त्यावर सहमती दर्शविली आहे. रशियाही त्यावर सहमत होईल, असे अमेरिकन प्रशासनाचे म्हणणे आहे.

अमेरिकेने शेजारी राष्ट्रे मेक्सिको आणि कॅनडा आणि नंबर एक मित्रराष्ट्र म्हणजे युरोप यांच्या विरोधात आयात कर युद्ध म्हणज सुरू केले आहे. वास्तविक, याबाबतचा विचारही कधी कोणी केला नव्हता. पण, अनेक मित्रराष्ट्रांच्या विरुद्ध अमेरिकेने व्यापार युद्ध सुरु केले आहे किंवा आयात कर वाढवला आहे. परिणामी, अमेरिकेचा मित्र असणे अतिशय धोकादायक बनले आहे, असे आता म्हटले जात आहे. युरोपचा नंबर एक शत्रू असणार्या रशियाला आता अमेरिका मोठी मदत करत आहे. अमेरिकेचा नंबर एक शत्रू चीनच्या विरोधात कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. हे सगळे का केले जात आहे? अमेरिकेला वाटत आहे की, ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्रीय हित जपत आहेत आणि त्यामुळे अमेरिका पुन्हा एकदा जागतिक महासत्ता बनेल.

अमेरिकेने लष्करी मदत थांबवल्यामुळे युक्रेनला युद्ध करणे अशक्य झाले. सुरुवातीला ब्रिटनने याबाबत पुढाकार घेऊन काही रक्कम देऊ केली; पण रशियाच्या मगरमिठीतून युक्रेनला सोडवण्यासाठी पुरेशी लष्करी मदत देण्याची क्षमता युरोपमध्ये नाही. असा धोका भारतालासुद्धा होऊ शकतो. म्हणून भारताने अमेरिका, रशिया, इतर देशांवर महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये असलेले अवलंबित्व कमी करून आत्मनिर्भर भारतावर जोर दिला पाहिजे. यामुळे कुठल्याही परिस्थितीमध्ये आपण युद्ध करण्याकरिता, शत्रूंच्या विरुद्ध कारवाई करण्याकरिता व भारताला सुरक्षित ठेवण्यामध्ये समर्थ राहू. आज ट्रम्प यांच्या रिसिप्रोकल टेरीफमुळे जगच अमेरिकेच्या विरोधात जात आहे. आपण अमेरिकेशी व्यापार युद्धामध्ये न पडता आपला आर्थिक फायदा केला पाहिजे. अमेरिकेकडून आपल्याला अत्याधुनिक तंत्रज्ञान म्हणजेच हवाई दलाच्या तेजस विमानासाठी जीईचे इंजिन जरुरी आहे. अमेरिकेकडून मिळणारे अत्याधुनिक ड्रोन्स आपण भारतामध्ये बनवून युद्धसज्ञता वाढविण्याचा प्रयत्न हा केलाच पाहिजे. अमेरिका तंत्रज्ञानाची महाशक्ती आहे आणि याचा वापर करून आपण ड्रोन्सच्या व क्षेपणास्त्र क्षेत्रामध्ये आपली प्रगती वेगाने करणे गरजेचे आहे. ट्रम्प यांनी दुसर्या महायुद्धापासून चालत आलेली युरोपसंदर्भातील अमेरिकेची पारंपरिक भूमिका बासनात गुंडाळली आहे. अमेरिकेने युरोपला प्रचंड दुखावले आहे. त्यामुळे युरोप आता भारताकडे आशेने पहात आहे. आपण ज्याचा फायदा घेऊन युरोपियन युनियनशी मुक्त व्यापार करार (फ्री ट्रेड ॲग्रीमेंट) करणे गरजेचे आहे. यामुळे युरोपशी असलेले व्यापारी संबंध वेगाने वाढतील आणि आपल्या आर्थिक प्रगतीचा वेगसुद्धा वाढेल. अमेरिकेने नाटोच्या बाहेर पडून युरोपला रशियापासून मोठा धोका निर्माण केला आहे. याचा फायदा घेऊन आपण युरोपशी आपले आर्थिक सहकार्य वाढवून त्यांना मदत केली पाहिजे. युरोपियन राष्ट्रे, खास तर फ्रान्स, जर्मनी, स्वीडन या देशांकडे असलेले अत्याधुनिक शस्त्रांच्या बाबतीतले तंत्रज्ञान जर भारतात तयार करता आले तर आपल्याला 'आत्मनिर्भर भारत'मध्ये मोठी मदत मिळू शकते आणि हे देश यासाठी नक्कीच तयार होतील.

# दक्षिण भारताला धास्ती!

मतदारसंघाच्या पुनर्रचनेचे भूत दाक्षिणात्य राज्यांतील नेत्यांच्या मानगुटीवर बसले आहे. देशात सरकार स्थापन करतेवेळी दक्षिणेतील राज्यांना बाजूला करण्याचा भाजपचा डाव आहे, अशी धास्ती वाटत आहे.

जनगणना झाल्यानंतर मतदारसंघाची पुनर्रचना केली जाणार आहे. साधारणतः हे काम पुढच्या वर्षी अर्थात २०२६ मध्ये होण्याची शक्यता आहे. याच कारणावरून तामिळनाडू राज्य अस्वस्थ झाले आहे. मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी दक्षिणेतील सर्व राज्यांसह तमाम विरोधी पक्षांतील नेत्यांना एकजूट करून मतदारसंघाची पुनर्रचना केली जात असताना दक्षिणेकडील राज्यांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घेण्यास सुरुवात केली आहे.

तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी शनिवारी चेन्नई येथे बोलाविलेल्या बैठकीत सात राज्यांतील १४ पक्षांचे नेते सहभागी झाले. यात केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेड्डी आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांचा समावेश आहे. याशिवाय शिरोमणी अकाली दलाचे कार्यकारी अध्यक्ष बलविंदर सिंह भूंदर आणि इंडियन यूनियन मुस्लीम लीगचे महासचिव पीएमए सलाम हेही सामील झाले होते.

विरोधी पक्षांची बैठक म्हणजे लोकशाहीला वाचविण्याचा प्रयत्न होय, असा दावा मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी केला आहे. मुळात, मतदार संघाची पुनर्रचना करायची असेल तर २०२६ मधील लोकसंख्येच्या आधारावर करू नये. ती १९७१ मधील आकडेवारीनुसार करावी अशी दाक्षिणात्य राज्यांची मागणी आहे. याच मुद्द्यावरून द्रमुकच्या खासदारांनी २० मार्च रोजी संसद भवनात घोषणाबाजी करीत निषेध नोंदविला आणि अन्य विरोधी पक्षांनी त्यांना पाठिंबा दर्शविला. मतदारसंघाची पुनर्रचना २०२६ ऐवजी २०३१ मध्ये करावी अशी दक्षिणेकडील राज्यांची मागणी आहे.

सध्या जे चित्र दिसत आहे त्यावरून असे दिसते की पुनर्रचनेबाबत निर्माण होणारा प्रश्न भविष्यात राजकारणाचा केंद्रबिंदू बनेल आणि केवळ दक्षिणेतूनच नव्हे तर लोकसंख्येवर प्रभावीपणे नियंत्रण करणार्या इतर अनेक प्रांतांतूनही प्रश्न उपस्थित होतील. परंतु दक्षिणेकडील राज्यांमध्ये पुनर्रचनेबाबतची चिंता इतर राज्यांपेक्षा वेगळी आहे. केवळ लोकसंख्येच्या आधारे पुनर्रचना झाली तर दक्षिणेतील राज्यांची राजकीय शक्ती कमी होईल असे त्यांना वाटते. उत्तर भारतातील जे राज्य लोकसंख्येमध्ये अव्वल आहेत ते अधिक प्रभावी होतील. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ८२, १७०, ३३० आणि ३३२ अंतर्गत लोकसभा, विधानसभा आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी मतदारसंघांच्या पुनर्रचनेची तरतूद आहे. जनगणना आणि त्यातून मिळालेल्या आकडेवारीच्या आधारे दर १० वर्षांनी पुनर्रचना केली जाईल, अशी राज्यघटनेत तरतूद आहे.



मतदारसंघाची पुनर्रचना करण्याचे काम १९५१ पासून ते १९७१ पर्यंत नियमितपणे सुरू होते. २००१ मध्ये मतदारसंघाच्या सीमारेषा पुन्हा आखण्यात आल्या होत्या. परंतु लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभेच्या एकूण जागांची संख्येत बदल झाला नाही. कारण तेव्हाही दक्षिणेकडील राज्यांकडून जोरदार विरोध झाला होता. अटल बिहारी वाजपेयी यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात २००१ मध्ये २०२६ पर्यंत जागा वाढवणार नाहीत असा निर्णय घेण्यात आला होता. सध्या लोकसभा आणि विधानसभांमध्ये ज्या जागा आहेत त्या १९७१ मधील लोकसंख्येच्या आधारावर आहेत.

त्यावेळी देशाची लोकसंख्या केवळ ५४ कोटी होती. परंतु त्यातही राज्य स्तरावर अनेक तफावत आढळून आली आहे. उत्तर प्रदेशला अजूनही जास्त प्रतिनिधित्व मिळते तर इतर राज्यांना कमी प्रतिनिधित्व मिळते. नंतर, जेव्हा पुनर्रचना २५ वर्षांसाठी रोखण्यात आली तेव्हा २०२६ पर्यंत उत्तर भारतातील राज्यांमध्ये लोकसंख्येवर नियंत्रण मिळविले जाईल अशी कल्पना करण्यात आली होती. पण घडले उलटेच. उत्तर भारतात लोकसंख्या नियंत्रित होण्याऐवजी आणखी वाढली. याउलट दक्षिणी राज्यांनी प्रभावीपणे लोकसंख्या नियंत्रित केली आणि काहींचा लोकसंख्या वाढीचा दरही नकारात्मक होता.

२०२१ ची जनगणना देखील अद्याप झालेली नाही. अशात २०११च्या जनगणनेस आधार मानून मतदारसंघाची पुनर्रचना केली गेली तरी दक्षिणेकडील राज्यांचे मोठे नुकसान होईल. आता समोर येत असलेल्या ढोबळ आकड्यांनुसार, जर पुनर्रचना झाली तर लोकसभेच्या जागांमध्ये आणखी २०० जागा वाढतील. एकूण ७५० जागांपैकी उत्तरेत एकूण ४०० जागा असतील, तर दक्षिण भारतातील सध्याच्या १२९ जागांमध्ये केवळ १० ते १२ ने वाढ होईल. लोकसभेच्या जागा ८८८ झाल्या तर पुन्हा मोठा फायदा उत्तर प्रदेशचाच होईल. २०२६ च्या लोकसंख्येचा आकडा धरला तर उत्तर प्रदेशच्या जागा ८० वरून १४३ पर्यंत वाढतील, तर बिहारच्या ७९, महाराष्ट्राच्या ७६, कर्नाटकच्या ४१, तामिळनाडूच्या ४९ वाढतील, पण केरळमध्ये एकही जागा वाढणार नाही, अशी परिस्थिती असेल. त्यामुळेच स्टॅलिन यांनी प्रस्तावित सीमांकन प्रक्रियेला विरोध करताना यापूर्वी राज्यांचे मुख्यमंत्री आणि प्रमुख पक्षांच्या नेत्यांकडून पाठिंबा मागितला आहे.

१७ एप्रिल १९५२ रोजी संविधानाच्या अंतर्गत पहिल्यांदा लोकसभेची औपचारिक स्थापना झाली तेव्हा खासदारांची संख्या ४९९ होती. सातव्या घटनादुरुस्ती कायदा, १९५६ अन्वये, खासदारांची कमाल संख्या पाचशे निश्चित करण्यात आली होती, जी ३१वी घटनादुरुस्ती. १९७३ नंतरच्या घटनादुरुस्तीनंतर ५२५ पर्यंत वाढ झाली. राज्यसभेच्या खासदारांची संख्या १९५२ मध्ये २०४ निश्चित करण्यात आली होती, जी १९६६ मध्ये २२८ आणि १९८७ मध्ये २३३ झाली. यामध्ये १२ खासदारांना राष्ट्रपती नियुक्त करतात. आता बरेच प्रश्न आहेत जसे की, सरकार कोणत्या वर्षीच्या जनगणनेच्या आधारे जागा ठरविणार. यासाठी, एक परिसीमन आयोग स्थापन करावा लागेल जो राज्यनिहाय जागांची संख्या निर्धारित मानकांनुसार ठरवेल, ज्याला संविधान दुरुस्ती विधेयकाद्वारे संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये दोन तृतीयांश बहुमताने मंजुरी द्यावी लागेल.

२०२३ मध्ये लोकसभेत भविष्यातील सीमांकनाबाबत काही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते, ज्यांना सरकारने अस्पष्ट उत्तर दिले होते. संख्या किंवा कमिशनबद्दल कोणतीही अचूक माहिती देण्यात आलेली नाही. मे २०२३ मध्ये एम के स्टॅलिन यांनी २० पक्षांना एकत्र करून जातजनगणनेच्या बाजूने जोरदार वातावरण तयार केले होते. २०२४च्या लोकसभा निवडणुकीत सामाजिक न्यायाचा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला होता. यावेळी जागावाढीचा मुद्दा महत्त्वाचा ठरणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी फेब्रुवारीमध्येच दक्षिणेकडील राज्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, असे सांगितले असले तरी सरकारकडे अद्याप कोणताही ठोस प्रस्ताव आलेला नाही. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होऊन राजकारण तापणार आहे.

# पाणी वाचवा जग वाचवा

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा असल्या, तरी पाण्याच्या अभावी अपुर्या आहेत. पाणीच नसेल तर जीवसृष्टी फार काळ तग धरू शकणार नाही. पाणी वाचवा तरच जग वाचेल.

२२ मार्च रोजी जागतिक जल दिवस साजरा करण्यात आला. १९९२ मध्ये पर्यावरण व विकास या विषयावर संयुक्त राष्ट्र संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यावेळेस जागतिक जल दिवस या विषयावर चर्चा करण्यात आली व संयुक्त राष्ट्र संघटनेने प्रत्येक वर्षी २२ मार्च रोजी जागतिक जल दिवस साजरा करण्याचे जाहीर केले. १९९३ मध्ये २२ मार्च रोजी संपूर्ण जगात जागतिक जल दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला.

जागतिक जल दिनाला पाणी वाचविण्याचा संकल्प दिवसही म्हटले जाते. जगाच्या भूभागाचा विचार केला तर या पृथ्वीतलावर ७० टक्के पाणी व ३० टक्के भूभाग आहे. तरीही जगात पिण्याच्या पाण्याची समस्या अत्यंत गंभीर असल्याचे दिसून येते. आज संपूर्ण जगात पिण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते त्यामागचे मुख्य कारण म्हणजे बदलते हवामान व जगातील वाढती लोकसंख्या. कारण जगातील ५० टक्के जंगलसंपदा मानवाच्या अतिरेकामुळे नष्ट झाली आहे. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता ते सरळ समुद्रात जात आहे. त्यामुळे दिवसेंदिवस समुद्राची पातळीही वाढत आहे. समुद्राची पातळी वाढणे म्हणजेच पृथ्वीतलावरील संपूर्ण सृष्टीच्या बाबतीत धोक्याची घंटा आहे. त्यामुळे पाण्याचा विषय साधा नसून अत्यंत गंभीर आणि चिंतेचा आहे.

दूषित वातावरणामुळे व तापमानामुळे अनेक हिमकडे कोसळताना आपण पहातो. यामुळे संपूर्ण जगात महाप्रलय, त्सुनामी आल्याचेही आपण पाहिले आहे. अनेकदा देवभूमीतील महाप्रलय हा हिमकडा कोसळल्याने आलेला आहे. मानवाच्या अतिरेकामुळे हिमकडे वेगाने वितळायला लागले तर पृथ्वीतलावर भीषण परिस्थिती निर्माण होईल. या पार्श्वभूमीवर पाणी वाचविण्यासाठी तळागाळातून प्रयत्न व्हायलाच पाहिजे. सध्या जगामध्ये आग लागण्याच्या घटना व वणवे लागण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात दिसून येतात. अनेक मोठमोठी जंगले अजूनही जळत आहे.कारण मानवाने जमिनीच्या पोटातील पाणी संपूर्णतः आटवून टाकले आहे. जगातील अनेक भागांत ज्वालामुखीचा उद्रेक मोठ्या प्रमाणात होताना आपण पहातो.



भूकंप, त्सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक या संपूर्ण घटना पृथ्वीतलावर पाण्याची पातळी कमी होत असल्याने होत आहे. भूगर्भात पाणी योग्य प्रमाणात टिकून राहिले असते तर ज्वालामुखी, त्सुनामी, महाप्रलय, भूकंप, वणवे इत्यादी विनाशकारी घटनांचा उद्रेक झाला नसता. अजूनही मानवजातीला पाण्याचे महत्त्व समजल्याचे दिसून येत नाही. पूर्वी नदी, ओढे, तलाव, झरा व विहिरीतून पाणी मुबलक मिळायचे; परंतु आता नदी, तलाव व विहिरी आटत आहेत. पाण्याचा दुष्काळ पाहता ५० ते ६० फुटांपर्यंतचे विहिरीचे पाणी आटल्याचे दिसून येते. त्यामुळे आता मानवजातीला बोरवेलचा सहारा घेऊन ५०० ते ७०० फुटांवर पाण्यासाठी जावे लागत आहे. मनुष्याला पाण्याचा अधिकार फक्त ५० ते ६० फुटांपर्यंतच होता. परंतु मानवाने पाण्यासाठी संपूर्ण सीमा ओलांडून पाताळात जाऊन तेथील पाण्यावर अतिक्रमण केल्याचे दिसून येते. म्हणजेच मानवाने सापाच्या बिळात हात टाकला आहे. ज्या पाण्यावर मानवजातीचा तिळमात्र अधिकार नाही तेही पाणी आपण आपली तहान भागवण्यासाठी वापरत आहोत. हा मानवाचा निसर्गसृष्टीवर खुला अन्याय व अत्याचार नाही काय?

अनेक देश अणुचाचण्या करीत आहेत. अशा परीस्थितीत पृथ्वी भूगर्भात पाण्याचा साठा कशी करेल? मानव आज आगीशी खेळत आहे त्यामुळे तो पाण्याचे महत्व विसरल्याचे दिसून येते. ही कठीण परिस्थिती पाहता जगाने युद्धाचा नव्हे तर पाणी वाचविण्याचा संकल्प करायला पाहिजे. अन्न, वस्त्र, निवारा आवश्यक आहे यात दुमत नाही, परंतु अन्न, वस्त्र, निवारा पाण्याशिवाय अपुरा आहे. त्यामुळे प्रत्येकाने पाण्याचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. आज जगातील वाढत्या पाण्याच्या समस्यांमुळे अनेक पशुपक्षी लुप्त झाल्याचे दिसून येते. पर्यावयण व निसर्ग सुरक्षित तर पाणी सुरक्षित. पाणी सुरक्षित तर मानव, पशुपक्षी, जीव-जंतू सुरक्षित, जीवसृष्टी सुरक्षित तर पृथ्वी सुरक्षित ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे. असे भाकीत आहे की २०४० मध्ये भारतात प्यायला पाणी मिळणार नाही. अशी स्थिती येऊ शकते हे नाकारता येत नाही. संयुक्त राष्ट्राने जगातील पाण्याच्या स्थितीच्या अहवालामध्ये ही भीती वर्तवली आहे. जगात पुढे पाण्याचे भीषण संकट येणार असून भारत या संकटाच्या केंद्रस्थानी असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

जगापुढे शुद्ध पाण्याचीसुद्धा गंभीर समस्या आहे. नद्या, सरोवरे, तलाव यामध्ये उपलब्ध असलेले पिण्याचे पाणी झपाट्याने प्रदूषित होत आहे. कारखान्यातील दूषित पाणी व सांडपाणी पिण्याच्या पाण्यापासून कोसो दूर ठेवण्याची गरज आहे. दूषित पाणी प्यायल्यामुळे जगात दरवर्षी लाखोच्या संख्येने मनुष्य हानी व पशुपक्ष्यांची हानी होताना दिसून येते.

आताही ८० टक्के पाणी प्रदूषित आहे. पाण्याच्या स्रोतांचे होणारे प्रदूषण आणि पाणी साठविण्यासाठी नसलेले नियोजन यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. याकडे दुर्लक्ष सुरूच राहिल्यास येणार्या काही वर्षांत पिण्याच्या पाण्याची समस्या आणखी भीषण होऊ शकते, असा इशारा पर्यावरण तज्ज्ञांचे दिला आहे. एक वर्षात पावसाचे पाणी अडविता आले तर पाच वर्षे पुरेल इतका पाणीसाठा आपल्याला उपलब्ध होऊ शकतो. परंतु त्यासाठी योग्य नियोजन करणे अजूनही आपल्याला जमलेले नाही. लक्षात ठेवले पाहिजे की पाणी संपले तर आपणही संपू. त्यामुळे प्रत्येकाने पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे आणि कृती केली पाहिजे तेव्हाच पाणी वाचेल. त्याचप्रमाणे 'पाणी वाचवा जग वाचवा' हा निर्धार संपूर्ण जगाने अंगीकारला पाहिजे. आजपासूनच प्रदूषण रोखण्याचा व पाणी वाचविण्याचा निर्धार केला पाहिजे.

# दिव्यांगाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत लातूरला १८ पदके' मैदानी क्रीडा प्रकारात दिव्यांग विद्यार्थ्यांचे यश

लातूर, दि. २४:– दिव्यांग कल्याण आयुक्तालय क्रीडा व युवक कल्याण सेवा संचालनालय व स्व.प्रभाकरराव दटके स्मृती सेवा संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथील रेशीमबाग मैदान येथे झालेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या राज्यस्तरीय स्पर्धेत लातूरच्या दिव्यांग खेळाडूंनी १८ पदके पटकावित घवघवीत यश संपादन केले. यात ०८ सुवर्ण, ०७ रौप्य, व ०३ कास्यपदाकांचा समावेश आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील जवळपास १५ दिव्यांग विशेष शाळांतील ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये मुकबधिर, मतिमंद, अस्थिव्यंग, अंध व बहूविकलांग प्रवर्गाचा समावेश होता. पदक विजेते खेळाडू – यात हर्षवर्धन रणखांब – सॉप्टबॉल सुवर्णपदक (संत बापुदेव साधू निवासी मतिमंद विद्यालय, लातूर), अभिषेक बंडगर – २०० मी धावणे कास्यपदक (निवासी अपंग कार्यशाळा, चाकूर), ज्ञानेश्वर कपासे – २०० मी धावणे सुवर्णपदक, कलीम शेख – व्हिलचेअर वर बसून





गोळा फेक, रौप्यपदक ( निवासी अस्थिव्यंग कर्मशाळा, उदगीर), गोविंद भांगे – १०० मी धावणे सुवर्णपदक, सादीया शेख – ५० मी धावणे रौप्यपदक (सुआश्रय निवासी अपंग विद्यालय, लातूर), दिव्यां मोठे– ५० मी धावणे सुवर्णपदक, १०० मी धावणे कास्यपदक, (निवासी अपंग विद्यालय, अहमदपूर) हरिश पुरी – गोळा फेक सुवर्णपदक, १०० मी धावणे रौप्यपदक, रवि कवठे – गोळा फेक सुवर्णपदक, राजू पवार – २०० मी धावणे रौप्यपदक, दर्शन मोरे – २०० मी धावणे कास्यपदक (संत गाडगेबाबा अनाथ मतिमंद मुलांचे बालगृह लातूर), मानवी पाटील – २५ मी चालणे सुवर्णपदक, वैष्णवी गोणे – बादलीत बॉल टाकणे रौप्यपदक, सुमेधा देशमुख – २५ मी चालणे सुवर्णपदक, आदिनाथ सलगर – गोळा फेक रौप्यपदक (संवेदना विद्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्था लातूर), लक्ष्मण म्हात्रे – ५० मी धावणे रौप्यपदक (एम.ए.बी अंध विद्यालय, उदगीर).

जि.पचेमुख्यकार्यकारीअधिकारीराहूलकुमारमीनायांनीकेलेकौतुक...

जिल्हा परिषचे मुख्य कार्यकारी अधिकारी, राहुलकुमार मीना यांनी जिल्ह्यातील या विजेत्या दिव्यांग खेळाडूंचे कौतुक केले. यासह समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता राजू गायकवाड, सहाय्यक सल्लागार बाळासाहेब वाकडे, क्रीडा शिक्षक महेश पाळणे, तुकाराम सिरसाठ, अण्णासाहेब कदम, व्यंकट लामजणे, तुकाराम यलमटे, प्रशांत चामे, रामनारायण भुतडा, भरत देवकते, परमेश्वर पाटील, इमरान पठाण, बस्वराज रोट्टे, प्रसाद औरादे, प्रवीण सुरनर, शहाजी बनसोडे यांनी ही विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले.

# उन्हाळ्यात घामामुळे शरीराची आग होते? मग शांत आणि आरामदायी झोपेसाठी फॉलो करा 'या' सोप्या टिप्स

उन्हाळ्यात झोपेची गुणवत्ता खराब होऊन जाते, ज्यामुळे काहीवेळा थकवा, अशक्तपणा जाणवण्याची शक्यता असते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला चांगल्या झोपेसाठी काही सोप्या टिप्स सांगणार आहोत.



राज्यभरात सगळीकडे कडक उन्हाळा वाढला आहे. वाढत्या उन्हाळ्याच्या झळांमुळे सर्वच नागरिक त्रस्त झाले आहेत. सतत घाम आल्यामुळे आणि शरीरातील पाण्याची कमतरता निर्माण झाल्यामुळे आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. याशिवाय उन्हाळ्यात रात्रीच्या वेळी व्यवस्थित झोप देखील लागत नाही. सतत थकवा किंवा अशक्तपणा जाणवणे, अस्वस्थता, घाम येणे इत्यादी अनेक गोष्टींमुळे झोपमोड होऊ लागते. झोपमोड झाल्यामुळे दुसऱ्या दिवशी शरीरात काम करण्याची इच्छा न होणे, सतत अशक्तपणा थकवा जाणवू लागतो. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला शांत झोपेसाठी कोणत्या टिप्स फॉलो कराव्यात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. हे उपाय केल्यामुळे झोपमोड न होता चांगली आणि आरामदायी झोप लागेल.(फोटो सौजन्य – )

आयुर्वेदिक गुणधर्मांनी समृद्ध असलेल्या तुपासोबत चुकूनही करू नका 'या' पदार्थांचे सेवन, शरीराला होईल त्रास

झोपण्याच्या खोलीमध्ये थंडावा ठेवणे:

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये तापमानात होणाऱ्या बदलांचा परिणाम शरीरावर लगेच दिसून येतो. सतत घाम आल्यामुळे त्वचादेखील तेलकट आणि चिकट होऊन जाते. त्यामुळे या दिवसांमध्ये झोप खराब होऊ नये म्हणून झोपण्याच्या खोलीत पंखा आणि एसीचा योग्य वापर करावा. याशिवाय झोपण्याआधी पांघरुण, उशा आणि गाद्या थंड करून घ्याव्यात, ज्यामुळे शांत झोप लागेल.

थंड पाण्याची अंघोळ करणे:

उन्हाळा सुरु झाल्यानंतर घामामुळे संपूर्ण शरीर तेलकट आणि चिकट होऊन जाते. शरीर तेलकट किंवा चिकट झाल्यानंतर योग्य वेळी अंघोळ न केल्यास घामाची दुर्गंधी शरीराला येते. त्यामुळे उन्हाळ्यात बाहेर जाऊन आल्यानंतर किंवा सकाळच्या वेळी थंड पाण्याची अंघोळ करावी. थंड पाण्याची अंघोळ केल्यामुळे शरीरातील उष्णता कमी होते.

सहज पचन होणाऱ्या पदार्थांचे सेवन करावे:

उन्हाळ्यात रात्री किंवा कोणत्याही वेळेत तेलकट तिखट पदार्थांचे सेवन करू नये. या पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्य बिघडते आणि शरीराला हानी पोहचते. त्यामुळे उन्हाळ्यात सूप, दही, फळे किंवा ग्रीन सॅलड इत्यादी हलक्या पदार्थांचे सेवन करावे. पचनास हलक्या असलेल्या पदार्थांचे सेवन केल्यामुळे शरीर सुद्धा निरोगी आणि आनंदी राहते.

स्क्रीनटाइम कमी करावा:

सतत मोबाईल किंवा टीव्ही लॅपटॉप पाहत राहिल्यामुळे शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्यसुद्धा बिघडून जाते. बिघडलेले आरोग्य सुधारण्यासाठी शांत झोप घ्यावी. झोपल्यामुळे शरीरात अनेक सकारात्मक बदल दिसून येतात. संपूर्ण शरीराला आरामाची आवश्यकता असते. आराम केल्यामुळे डोळ्यांनासुद्धा विश्रांती मिळते.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांचा लातूर जिल्हा दौरा

लातूर :– महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे हे मंगळवार, २५ मार्च २०२५ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

श्री. लोखंडे यांचे सोलापूर येथून २५ मार्च रोजी सकाळी १० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल. सकाळी १०.३० वाजता लातूर शहर महानगरपालिका यांच्यासोबत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची माहिती घेतील. दुपारी १२ वाजता आर.सी.सी. कॉलेज येथे प्रा. मोटेगावकर यांच्यासोबत बैठक. दुपारी १२.३० वाजता अहमदपूर नगरपालिका मुख्याधिकारी यांच्यासमवेत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. दुपारी १.३० वाजता औसा नगरपालिका यांच्यासमवेत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. दुपारी २.३० वाजता उदगीर नगरपालिका मुख्याधिकारी यांच्यासमवेत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. दुपारी ३.३० वाजता निलंगा नगरपालिका मुख्याधिकारी यांच्यासमवेत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. सायंकाळी ४.३० वाजता चाकूर नगरपंचायत मुख्याधिकारी यांच्यासमवेत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील. सायंकाळी ५.३० वाजता जळकोट नगरपंचायत यांच्या समवेत अनुसूचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी करतील व हिंगोलीकडे प्रयाण करतील.

# स्वाभिमानी कार्यकर्ता : कालकथित – दीपक गायकवाड यांच्या स्वप्नातील नालंदा बुद्ध विहाराचे अपुर्णकाम पुर्ण करणार..!

### ( श्रध्दांजली शोकसभेत उपस्थितांनी केला संकल्प )

नवी मुंबई / के. एच. हनवते :– वंचित बहुजन आघाडी बोनसरी गांव तुर्भे (एमआयडीसी) येथील स्वाभिमानी आणि आंबेडकर घराण्याशी एकनिष्ठ धडाडीचे कार्यकर्ते तसेच सर्पमित्र दीपक गायकवाड यांना दिनांक – १८ फेब्रुवारी रोजी डी.व्ही.जी. कंपनी नवी मुंबई एअरपोर्ट येथे साप पकडण्याकरिता पाचारण करण्यात आलेल्या कारवाईत दीपक गायकवाड यांना सर्पदंश झाला. प्राप्त माहितीनुसार त्यानंतर लगेच त्यांना (न.मु.म.पा.) सेक्टर – १० वाशी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु दोन दिवसानंतर त्यांची त्वचा काळी पडल्याने वैद्यकीय सल्ल्यानुसार आणि वंचित बहुजन अघाडी राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय बाळासाहेब आंबेडकर साहेब यांच्या अथक प्रयत्नातून बाजूच्या फोर्टीज या खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले. त्यानंतर दहा ते बारा दिवसांपूर्वी त्यांना मुंबईच्या जे जे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अखेर मृत्यूची झुंजत असताना दिनांक – १५ मार्च २०२५ रोजी सर्प मित्र : दीपक गायकवाड यांची प्राणज्योत मालवली. अंत्यसंस्कार यात्रेमध्ये तमाम आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते सहभागी होते. भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदरणीय भिमराव आंबेडकर साहेब हे सुद्धा दुःखद अंत्यसंस्कार यात्रेमध्ये सहभागी होते. या घटनेनंतर, संपुर्ण नवी मुंबई जिल्ह्यामध्ये वंचित बहुजन आघाडी व बौद्ध समाजातील त्यांच्या चाहत्यांमध्ये शोककळा पसरली आहे. कालकथित दीपक गायकवाड यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबामध्ये आई, दोन भाऊ व तीन बहिणी असा मोठा परिवार आहे. नितिन विश्वनाथ गायकवाड , वनमाला गायकवाड , रुक्मिणी गायकवाड , चंद्रकला गायकवाड , अनिता शिंदे , दिलिप गायकवाड या शोकाकुल : परिवारांच्या उपस्थिमध्ये नालंदा बुद्ध विहार बोनसरी गांव तुर्भे येथे शनिवार दिनांक २२ /०३/२०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजता सर्वप्रथम महापुरुषांची पुजा करण्यात आली. नंतर कालकथित दिपक गायकवाड यांच्या प्रतिमेस त्यांच्या घरातील दुःखद परिवाराने पुष्पहार अर्पण केला. तद्नंतर त्यांना उपस्थितांनी पुष्प अर्पण केले. अनिल शिंदे गुरुजी ( मा. जिल्हाध्यक्ष भा. बौ. महासभा व विद्यमान मेजर समता सैनिक दल नवी मुंबई जिल्हा बटालियन यांनी सुत्रपठन घेतले. नालंदा बुद्ध विहार भा. बौ. महासभा महिला कमिटी बोनसरी गांव शाखा व विभागातील उपासक व उपासिका त्याचप्रमाणे वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई जिल्ह्यातुन तमाम पदाधिकारी, बेलापुर तालुका पदाधिकारी व रिपब्लिकन सेनेचे पदाधिकारी व भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा व इतर शाखांचे पदाधिकारी यांच्या वतीने श्रध्दांजली शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळेस उपस्थित चाहत्यांनी कालकथित दीपक गायकवाड यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहीली. व त्यांचे नालंदा बुद्ध विहार याचे अपुर्ण काम पुर्ण करण्याचा संकल्प केला. हा संकल्प आम्ही सर्व आंबेडकरी समाज बांधवांच्या सहकार्यातून करणार..! असा संकल्प सर्वांनी केला. या दुःखद शोकसभेसाठी प्रामुख्याने विरेंद्र लगाडे ( जिल्हाध्यक्ष – रिपब्लिकन सेना ) , सुनिल भोले (अध्यक्ष – बेलापुर तालुका – वंचित बहुजन आघाडी ) , सुभाष बलखंडे ( सामाजिक कार्यकर्ते ) , राजेंद्र बनसोडे ( पत्रकार ), अशोक शेगांवकर , अशोक शिरसाट ( सामाजिक कार्यकर्ते ) , बाळासाहेब शिंदे ,अंकुश गायकवाड , सतिष खंडाळे धडाडीचे कार्यकर्ते तद्वतच अध्यक्ष – पंचशील बुद्ध विहार तुर्भे स्टोअर्स , कल्याण हणवते बौध्दाचार्य , पत्रकार तद्वतच उपाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी बेलापुर तालुका ), संजय झनके गुरुजी – सरचिटणीस –





भा. बौ. महासभा सिवुडस शाखा , विकास सोनोने गुरुजी (जिल्हा सरचिटणीस – भा. बौ. महासभा नवी मुंबई जिल्हा) प्रकाश माने गुरुजी ( कोषाध्यक्ष – भा. बौ. महासभा नवी मुंबई जिल्हा ), विजय झनके गुरुजी ( संस्कार – सचिव )भा. बौ. महासभा नवी मुंबई जिल्ह , दत्तात्रय भालेराव ( पर्यटन सचिव – भा. बौ. म. नवी मुंबई जिल्हा ) , युवराज सोनोने (मुंबई प्रदेश माजी संघटक ) खिराजी धापसे 'अनिल शिंदे गुरुजी ( मेजर – समता सैनिक दल नवी मुंबई जिल्हा बटालियन ) रेखा इंगळे – अध्यक्ष नालंदा बुद्धविहार महिला कमिटी व इतर पदाधिकारी, प्रकाश वानखेडे, गौतम गायकवाड ( सामाजिक कार्यकर्ते ), विलास इंगळे जिल्हा संपर्कप्रमुख पॅंथर आर्मी, इतर आंबेडकर चळवळीत कार्यरत असणाऱ्या इतर संस्थाचे पदाधिकारी शोकसभेला उपस्थित होते. उपस्थितांनी कालकथित दिपक गायकवाड यांच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय कार्यावर प्रकाश टाकला. उपस्थितांनी सामुहिक श्रद्धांजली अर्पीत केली. शोकसभेच्या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संजय झनके गुरुजी यांनी केले. सरणत्तय घेवुन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# १०० दिवसांच्या क्षयरुग्ण शोध मोहिमेत आढळले ८९८ क्षयरुग्ण !

लातूर :– क्षयरोग हा मायकोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसीस या जीवाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार असून याचा प्रसार श्वसनाद्वारे होतो. जगातील एकूण क्षयरुग्णांपैकी सुमारे २५ टक्के क्षयरुग्ण हे भारतात आढळून येतात. भारतातील क्षयरुग्णांपैकी जवळपास १० टक्के रुग्ण महाराष्ट्रात आढळून येतात. लातूर जिल्ह्यात सन २०२४ मध्ये २९७१ क्षयरुग्ण आढळून आले आहेत. सन २०२५ राज्य क्षयरोग विभागाकडून जिल्हयास २८५० क्षयरुग्ण शोधण्याचे उदिदष्ट दिलेले आहे. जिल्ह्यामध्ये जानेवारी व २३ मार्च २०२५ दरम्यान ७०१ क्षयरुग्ण आढळले आहेत. जागतिक स्तरावरील शाश्वत विकास ध्येयानुसार सन २०३० अखेर क्षयरोगाचे दुरीकरण करणे अपेक्षित आहे. मात्र, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सन २०२५ अखरे देशातून क्षयरोगाचे दुरिकरण करण्याचे महत्वकांक्षी लक्ष्य ठेवलेले आहे. त्याअनुषंगाने देशात राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. उपक्रमाचा एक भाग म्हणून केंद्रीय क्षयरोग विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ७ डिसेंबर २०२४ ते दिनांक २४ मार्च २०२५ दरम्यान जिल्हयातील क्षयरोगासाठी अतिजोखीम असलेल्या निवडक कार्यक्षेत्रात १०० दिवस क्षयरुग्ण शोध मोहिम राबविण्यात आली . या मोहिमेदरम्यान १७ मार्च २०२५ अखेर जिल्हयात ८९८ क्षयरुग्णांचे निदान करण्यात आलेले आहे. जागतिक स्तरावर क्षयरोगाची जागरुकता प्रभावीपणे वाढविण्यासाठी दरवर्षी २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून जागतिक स्तरावर मृत्युच्या प्रमुख कारणांपैकी एक असलेल्या क्षयरोगाकडे सर्वाच्या एकत्रित सहकार्याने लक्ष वेधण्यात येते. या दिनाचे औचित्य साधून क्षयरोगाविषयी जिल्हास्तर, तालुकास्तर व सर्व आरोग्य संस्थास्तरावर व्यापक जनजागृती करण्यात येते.







क्षयरोगाच्या महत्वाच्या बाबींकडे लक्ष वेधण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना जागतिक क्षयरोग दिनानिमित्त दरवर्षी एक घोषवाक्य प्रसारित करते, ते खालील प्रमाणे आहे, 'होय आपण क्षयरोग निश्चित संपवू शकतो: प्रतिज्ञा करा, तरतूद करा, सेवा द्या' हे यावर्षीचे घोषवाक्य आहे. क्षयरुग्णांच्या फायद्यासाठी प्रतिज्ञेनुसार व केलेल्या तरतूदीनुसार त्यांना दर्जेदार सेवा देणे. जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून दिनांक २४ मार्च २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता राहुल कुमार मीना यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या अनुषंगाने लातूर येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे सर्व प्रथम डॉ.रॉबर्ट कॉक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.तांबारे एस.एन. यांनी केले. प्रास्ताविकपर बोलताना राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेले विविध मोहीम व उपक्रमाबाबतची माहिती देण्यात आली. तसेच लातूर जिल्हा हा लवकरात लवकर क्षयरोगमुक्त करण्याचा निर्धार केला आणि क्षयरोगाची जास्तीत जास्त प्रमाणात जनजागृती करण्याचे आवाहन केले. त्यानंतर डॉ. सहाय्यक संचालक संजय ढगे यांनी क्षयरोगाविषयी समाजामध्ये असलेला नकारात्मक दृष्टीकोण संपविण्याचा संदेश दिला व क्षयरोग संपविण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे सांगितले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना लातूर यांनी आरोग्य विभागामार्फत रुग्णांना वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्फत जलद व दर्जेदार सेवा देत असले बाबत समाधान व्यक्त केले. जिल्ह्यात टीबीमुक्त ग्राम पंचायत अभियान राबवून जास्तीत जास्त ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त करण्याबाबत योग्य उपाययोजना राबविण्याच्या सूचना दिल्या. तसेच क्षयरोगाचे लक्षणे असल्यास जवळच्या आरोग्य संस्थेत जावून क्षयरोगाची तपासणी करुन घेण्याचे आवाहन केले.

कै.वसंतराव काळे, होमिओपॅथीक महाविद्यालय येथील विद्यार्थीनींनी क्षयरोगाबाबत जनजागृतीपर पथनाटय सादर केले. या कार्यक्रमामध्ये सहभाग घेतलेल्या नर्सिंग महाविद्यालय / महाविद्यालय व तसेच पथनाट्य सादर केलेल्या विद्यार्थीनीना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थितांनी क्षयरोग दुरीकरणासाठी टिबीमुक्त भारत करण्याची शपथ घेतली. मान्यवराच्या हस्ते रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीस सुरवात झाली. रॅली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून महात्मा गांधी चौक मार्गे परत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आल्यानंतर रॅलीचे समारोप करण्यात आले. निक्षय वाहनद्वारे शहरामध्ये जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, सहाय्यक संचालक, ढगे संजय, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.ढेले प्रदिप, आयएमए अध्यक्ष डॉ.डोळे विमल, डॉ.वाघमारे व्ही. एन., अति.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बरुरे बालाजी, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.तांबारे एस.एन., वैद्यकीय अधिकारी डॉ. जाधव बाळासाहेब, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.पवार आर. एच., डॉ.यादव अभिजित, वैद्यकीय अधिकारी डॉ.राऊत एच.के., वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे माधव, वैद्यकीय अधिकारी बांगर ए.आर. वैद्यकीय अधिकारी, डॉ.वाघमारे आर.एन, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ.कदम मनोज व जिल्हा क्षयरोग केंद्र, लातूर येथील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# केज पोलीस स्टेशनच्या वतीने इफ्तार पार्टी संपन्न

केज/प्रतिनिधी दिनांक २४ मार्च २०२५ रोजी केज पोलीस स्टेशनच्या वतीने मुस्लिम समाज बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या इफ्तार पार्टीला मुस्लिम समाज बांधवासह सामाजिक,राजकीय शैक्षणिक, वैद्यकीय क्षेत्रासह इतर क्षेत्रातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते. मोठ्या उत्साहात केज पोलीस ठाणे येथे इफ्तार पार्टी संपन्न झाली. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सध्या रमजान महिना चालू आहे या महिन्यांमध्ये सर्वत्र मुस्लिम समाज बांधव हे रोजा (उपवास) ठेवतात रमजान महिना हा पवित्र महिना व पवित्र सण आहे असे मानले जात आहे. गेल्या अनेक वर्षापासून केज पोलीस ठाण्याच्या वतीने मुस्लिम समाज बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन केले जात आहे. याही वर्षी केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचाऱ्यांनी इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते.



इफ्तार पार्टीच्या माध्यमातून मुस्लिम व हिंदू समाजामध्ये भाईचारा एकोपा आणि सुलोख्याचे वातावरण राहावे त्याचबरोबर विचाराची देवाणघेवाण दोन्हीही समाज बांधवांमध्ये व्हावी या उद्देशाने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस निरीक्षक वैभव पाटील, केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार, गटनेते राजूभाई इनामदार, गटनेते भाऊसाहेब गुंड, माजी उपनगरध्यक्ष दलितभाई इनामदार, माजी नगराध्यक्ष कबीरभाई इनामदार, रिपाईचे केज तालुकाध्यक्ष सुनील हिरवे, केजचे सुफी संत बाबा, दलित चळवळीचे लखन हजारे, योगेश गायकवाड, शरीफ सय्यद, पत्रकार मुबाशीर खतीब, वसंत सोनवणे, तात्या गवळी, संजय खळगे, ड. जीवन बांगर,पवन बनसोड, हाफीज शबीर साहेब यांच्यासह मुस्लिम समाजाचे धर्मगुरू, मुस्लिम समाजबांधव व राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, पत्रकार, व्यापारी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक व केज पोलीस ठाण्याचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

# केज शहरातील अरजान खतीब या चिमुकल्यांनी वयाच्या ७ व्या वर्षी ठेवला जीवनातील पहिला रोजा

केज/प्रतिनिधी केज शहरातील अरजान खतीब या चिमुकल्यांनी वयाच्या ७ व्या वर्षी जीवनातील पहिला रोजा ठेवला आहे.अरजानचे होतेय सर्व स्तरातून कौतुक सध्या रमजान महिना चालू आहे, परंतु सध्या कडक उन्हाळा आहे, कडक उन्हाळ्यात या चिमुकल्याने रोजा ठेवला होता. रमजान महिना हा मुस्लिम समाजाचा पवित्र महिणा माणला जातो या महिन्यात मुस्लिम बांधवांकडुन दिवसातील १६ तास रोजा ठेवतात या दरम्यान काहिच खाता व पीता येत नाही, शिवाय पाणी ही घेता येत नाही. या पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम समाजातील लहान मुल- मुली देखील कठोर उपवास म्हणजे रोजा ठेवतात त्याचाच एक भाग म्हणून केज शहरातील रोजा मोहल्ला



येथील अरजान आसेफ खतीब वय ७ वर्षे या चिमुकल्याने आज दिनांक २३ मार्च २०२५ रोजी आपल्या जीवनाचा पहिला रोजा पुर्ण केला असून ७ वर्षिय अरजान खतीब यास त्याची आजी ने कौतुक करुण दुवा दिली, व आई-वडील यांच्यासह नातेवाईकांकडून शुभेच्छा व आशिर्वाद देण्यात आले.

# बीड तालुक्यातील खडकी घाट व येळंब घाट येथे येणाऱ्या पाणलोट रथयात्रेच्या स्वागताची प्रशासन स्तरावर जय्यत तयारी

ग्रामीण भागात पाणलोट कामावर श्रमदान करणे अपेक्षित सर्व शासकीय यंत्रणांना एकत्र घेऊन प्रत्येक गावागावांमध्ये जाऊन पाणलोट चळवळ निर्माण व्हावी. या हेतूने मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने कामांचे भूमिपूजन करणे व पाणलोट युद्ध यांची निवड करणे, पाणलोट कामावर श्रमदान करणे यासह विविध उपक्रमाचे नियोजन करून या उपक्रमामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील व माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी यांच्यासह बचत गटातील महिला आणि स्वयंसेवी संस्था त्याचबरोबर शेतकरी यांच्यासह सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या प्रमाणात वाटरशेड रथयात्रेमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. त्याचबरोबर सदर कार्यक्रम मोठ्या उत्सवात संपन्न व्हावा याकरिता सर्वांनी प्रयत्न करून प्रत्येक नागरिकांनी स्वतःचा सहभाग नोंदवा असे आवाहन बीड जिल्हा जलसंधारण अधिकारी संजय आमले यांनी केले आहे.

बीड/प्रतिनिधी बीड तालुक्यातील खडकी घाट व येळंब घाट येथे येणाऱ्या पाणलोट रथयात्रेच्या स्वागताची प्रशासन स्तरावर जय्यत तयारी चालू आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ रोजी पासून वॉटरशेड रथयात्रेस प्रारंभ झाला असून राज्यातील ३० जिल्ह्यांमधून वाटरशेड रथयात्रा येत आहे. चला मृदा व जलसंवर्धनाची शपथ घेऊ या हा नारा घेऊन भूमी संसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय,भारत सरकार तसेच मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत जनतेला मृद व जलसांधारांचे महत्त्व व गरज पटवून सांगणे तसेच प्रचार प्रसिद्धी करिता वाटरशेड यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणुन दिनांक २६ मार्च २०२५ रोजी सकाळी ठीक ९-०० वाजता खडकी घाट ता. बीड येथे वॉटरशेड रथयात्रेचे आगमन होणार आहे. तर सदर रथयात्रा ही सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत खडकी घाट येथे थांबणार आहे या माध्यमातून विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत. येळंब घाट येथे दुपारी २-०० वाजता वॉटरशेड रथयात्रेचे आगमन होणार आहे येथे दुपारी २ ते सायं. ६ वाजेपर्यंत रथयात्रा थांबणार आहे. या रथयात्रेच्या माध्यमातून विविध उपक्रम घेऊन शेतकरी व नागरिकांना आणि बचत गटांच्या महिलांना विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी बीड तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने रथयात्रेमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा सदस्य/सचिव जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र (डब्ल्यूसीडीसी) मृद व जिल्हा संधारण बीड विभागाचे संजय आमले यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार संदीप भैय्या क्षीरसागर, आमदार नमिताताई मुंदडा यांच्या शुभ हस्ते संपन्न होणार आहे. तर या



कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक साहेब, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने साहेब, जिल्हा कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक सुभाष साळवे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा संचलिका, श्रीमती संगीतादेवी पाटील, उपविभागीय अधिकारी श्रीमती कविता जाधव यांची उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन खडकी घाटचे सरपंच श्रीमती करिष्मा वाघ, येळंब घाटचे सरपंच श्रीमती सरिता कदम, जलसंधारण अधिकारी तथा पाणलोट पथक प्रमुख चेतन देशमुख, श्रीपाद देशपांडे, जिल्हा जलसंधारण अधिकारी संजय आमले, जलसंधारण अधिकारी तथा पाणलोट पथक प्रमुख, श्रीमती पल्लवी ढाकणे, तालुका पर्यवेक्षक तथा कृषी तज्ञ उपविभाग जलसंधारणचे बाबासाहेब कोकाटे, सिव्हिल इंजिनियर ऋषिकेश जानवळे, तालुका पर्यवेक्षक तथा समूह संघटक उपविभाग जलसंधारण, श्रीमती मीरा खरात यांनी केले आहे. तरी वॉटरशेड रथयात्रेच्या कार्यक्रमांमध्ये या भागातील व परिसरातील बचत गटाच्या महिला,गावातील ग्रामस्थ, युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ. संतोष पाटील गोराडखेडेकर यांची प्रदेश प्रवक्ता पदी निवड

पाचोरा :- प्रसिद्ध व्याख्याते लेखक व समुपदेशक डॉक्टर संतोष पाटील गोराड खेडेकर यांची अखिल भारतीय बळी राजा संघटन भारत यांच्या महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता पदी निवड करण्यात आली. ही निवड संस्थापक अध्यक्ष निवृत्ती डक पाटील व त्यांच्या कार्यकारणीने केली. यासंबंधीचे नुकतेच ऑफिशियल नियुक्ती पत्र पाटील यांना मिळाले. पाटील हे सुप्रसिद्ध व्याख्याते लेखक समुपदेशक व समाजसेवक आहेत त्याबरोबर ते मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालया अंभई येथे शिक्षक म्हणून कार्य करतात . ते संपूर्ण महाराष्ट्रभर महामानवांचे विचार पोहोचवत असतात व त्या बदल्यात मिळणारे मानधन ते सामाजिक कार्यात खर्च करत असतात. शोभाई निराधार वृद्धाश्रम कुरंगी तालुका पाचोरा जिल्हा जळगाव यात ते सचिव म्हणून कार्यरत आहेत. पाटील यांना त्यांच्या सामाजिक कार्यासाठी असंख्य राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत त्यांच्या शैक्षणिक सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना हे नियुक्तीपत्र देण्यात आले. याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे



# अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढ मागणीसाठी आझाद मैदानात महिला शिक्षकांचा आत्मदहनाचा प्रयत्न; पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे अनर्थ टळला

मुंबई/प्रतिनिधी राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना वाढीव अनुदानाच्या टप्प्यासाठी निधीची तरतूद करा या मागणीसाठी राज्यातील शिक्षकांनी आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले. परंतु आपल्या हक्काच्या वेतनासाठी सातत्याने आंदोलन करून ही सरकारला कसलीच जाग येत नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या महिला शिक्षिकांनी अंगावर रॉकेल ओतून घेत स्वतः ला जाळून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. या घटनेने आझाद मैदान परिसरात एकच खळबळ उडाली.

राज्यातील अंशतः अनुदानित, विनाअनुदानित त्रुटी पूर्तता केलेल्या शाळा व मूल्यांकनास पात्र असलेल्या शाळांचे सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आझाद मैदानावर आपल्या न्याय हक्कासाठी आंदोलन करीत आहेत. परंतु सातत्याने आंदोलन करून आपल्या हक्काच्या मागण्या शासनापुढे मांडून देखील शासन आपल्या मागण्या पूर्ण करत नाहीत. आम्ही सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असतानाही सरकार आमच्या मागण्याबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार करत नाही त्यामुळे आझाद मैदानात आंदोलन करणाऱ्या शिक्षकवृंदात संतापाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी तीव्र संतापलेल्या गावंडे मॅडम आणि साळवी मॅडम या दोन्ही मॅडम दोन महिला शिक्षिकांनी काल दिनांक २४ मार्च २०२५ रोजी दुपारी ३-०० वाजण्याच्या सुमारास आझाद मैदानात स्वतः च्या अंगावरती रॉकेल ओतून स्वतःला जाळून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेने आझाद मैदान परिसरात एकच खळबळ उडाली. दरम्यान सदर घटनेची माहिती मिळताच शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत सर्व प्रकारची माहिती घेतली. यावेळी जीवाचं बरं वाईट



करू नका किंवा आत्मदहना सारख्या मार्ग अवलंबून आपलं जीवन संपवू नका. शांततेच्या मार्गाने आपल्या मागण्या सरकारकडे मांडू. सरकार निश्चितच आपल्या मागण्या पूर्ण करेल असा विश्वास यावेळी शिक्षक आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी व्यक्त करत कोणत्याही शिक्षकांनी चुकीचं पाऊल उचलू नये असे आवाहन आंदोलनकर्त्यां शिक्षकांना केले.

# सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागते - अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांचे प्रतिपादन

लातूर :- समाजात कोणताही बदल सहजासहजी घडत नसतो, त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करावीच लागते असे प्रतिपादन श्री महात्मा बसेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, लातूर आणि आम्ही सेवक, हैप्पी व्हिलेज, हासेगाव ता.औसा जि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने हॅप्पी व्हिलेज, हासेगाव येथे युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी विशेष युवक वार्षिक शिबिराचा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. यावेळी विचारपीठावर उद्घाटक आम्ही सेवकचे संस्थापक प्रा. रवी बापटले, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, संचालक राजेश्वर बुके, संचालक बस्वराज येरटे, संचालक प्रा. जी. एम. धाराशिवे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गुणवंत बिरादार रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, प्रो. डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके आणि प्रा. मनोज मोटे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना आदिनाथ सांगवे म्हणाले की, प्रा. रवी बापटले यांनी सेवालयाच्या माध्यमातून पडीक, खडकाळ आणि बंजर जमिनीत टोकाच्या संघर्षातून नंदनवन उभे केले आहे. त्यांनी अनेक वेळा हाल अपेष्टा सहन करून समाज आणि कुटुंबाचा रोष पत्करून केवळ एचआयव्हीग्रस्त मुलांच्या कल्याणासाठी अहोरात्र कष्ट करून ते आज ८५ मुलांमुलीचे आधारवड बनले आहे असे सांगून त्यांनी हॅप्पी व्हिलेजला एक लाख रुपयांची देणगी जाहीर सुद्धा केली. उपस्थित सर्वांनी उभे राहून त्यांचे टाळ्या वाजवून स्वागत केले. उद्घाटक म्हणून बोलताना प्रा. रवी बापटले म्हणाले की, रुग्णांचे केवळ आरोग्य न सुधारतात त्यांचे शिक्षण, स्वयंरोजगार,



स्वच्छता, व्यवसायिक शिक्षण, परिवार याही गोष्टीवरही लक्ष देणे गरजेचे असते. अलीकडच्या काळात समजाच्या संवेदना हरवत आहेत, त्यामुळे रासेयोच्या विद्यार्थ्यांना सेवेसाठी सेवालयासारख्या संस्था दाखवल्या पाहिजे. आयुष्य हे खूप सुंदर असते. आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक संकटाशी झुंज देऊन नवा इतिहास घडवला पाहिजे असेही ते म्हणाले. यावेळी संचालक प्रा. जी. एम. धाराशिवे आणि स्वागतपर मनोगत प्राचार्य प्रो. डॉ. संजय गवई यांनी व्यक्त केले, प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रो. डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी केले. सूत्रसंचालन ऋतुजा भिसे आणि जयश्री भंडे यांनी केले. स्वागत गीत शिवाली मुकडे हिने सादर केले तर आभार डॉ. मनोहर चपळे यांनी मानले. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी सेवालालयाच्या विविध महत्त्वपूर्ण उपक्रमांची माहिती घेऊन प्राचार्य, रासेयो कार्यक्रमाधिकारी, स्वयंसेवक आणि विद्यार्थी विद्यार्थिनींच्या समवेत हॅप्पी व्हिलेज येथील शेतामध्ये ऊस लागवड सुद्धा केली. या कार्यक्रमाला संभाजी लातुरे, रासेयो स्वयंसेवक-स्वयंसेविका आणि हॅपी व्हिलेज येथील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# महाराष्ट्राच्या जडण - घडणीत मा.म.देशमुख यांचे मोठे यांचे योगदान आहे. -- प्राचार्य नागोराव कुंभार.

लातूर :- इतिहासकार, विचारवंत,साहित्यिक आणि कलावंत समाजाचे प्रेरणास्त्रोत असतात. अशी प्रेरणा देणारे विचार मा.म. देशमुख यांच्या लेखनात आहेत. त्यांच्या लेखनातील तटस्थता आणि वस्तुनिष्ठता समाजाला प्रबोधित करते. आजच्या पुरोगामी महाराष्ट्राच्या जडण - घडणीत इतिहासकार आणि विचारवंत मा.म.देशमुख यांचे खूप मोठे योगदान आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी केले आहे.

थोर इतिहासकार आणि संशोधक प्रा.मा.म. देशमुख यांचे नुकतेच नागपूर येथे निधन झाले. त्यानिमीत्ताने ' जी-२४ ' च्या वतीने लातूर येथील सरस्वती विद्यालयात श्रध्दांजलीचा कार्यक्रम तथा शोकसभा संपन्न झाली. यावेळी प्राचार्य कुंभार बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मा.म. देशमुख यांच्या सत्य आणि परखड विचार मांडणीमुळे प्रतिगाम्यांनी त्यांना त्रास दिला. पण त्यांनी निर्भीडपणे त्याला तोंड दिले. त्यांच्यावर झालेल्या आरोपाचे त्यांनी आपल्या वाणी आणि लेखणीतून चोख उत्तर दिले. कायद्यानेही त्यांनी ती लढाई जिंकली. त्यांचे विचार घेऊन वाटचाल करणे हीच खरी त्यांना श्रध्दांजली ठरेल असेही ते म्हणाले. समाजवादी नेते शिवाजीराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शोकसभेत सर्वश्री प्राचार्य आर.डी. निटूरकर,प्रा.डॉ.अशोक नारनवरे,प्रा.अर्जुन जाधव,शिरीष दिवेकर, इंजि.श्रीधर शेवाळे यांनी मा.म.देशमुख यांचे विचार आणि आठवणी सांगीतल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस दिवंगत मा.म.देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पाहार घालून अभिवादन करण्यात आले. प्रा.डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचलन यु.डी.गायकवाड यांनी केले तर नरसिंगराव घोडके यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास सर्वश्री प्रा.डॉ. निशीकांत वारभूवन,अ‍ॅड. किरण कांबळे, अ‍ॅड. सोमेश्वर वाघमारे,पत्रकार लक्ष्मण दावणकर, प्रा. हलगरकर, प्रा.डॉ. मारोती गायकवाड, ' लसाकम ' चे जिल्हाध्यक्ष एकनाथ पलमटे, राजेंद्र हजारे, श्यामसुंदर चव्हाण, पी.के.सावंत, अंगद नेटके,बाबुराव भाले, डी.उमाकांत, श्रीकांत मुद्दे आदी मान्यवरांसह ' जी -२४ ' चे सदस्य आणि शहरातील बुद्धीजीवी वर्ग उपस्थित होता.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE